उस्मानाबाद जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
22 NOV 2013

जिल्हा परिषद, उस्मानाबाद
बांधकाम विभाग
शाखा...
28 NOV 2013
आवक क्र. 220

मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधांच्या कामांबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्र.विकास-२०१३/प्र.क्र.१५४/योजना-६
सार्वजनिक बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : ०१ नोव्हेंबर,२०१३

वाचा : १) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्रमांक: विकास २००९/प्र.क्र.८/पंरा-८, दिनांक २४.०२.२००९.
२) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्रमांक: झेडपीए- २००८/प्र.क्र.४७२/वित्त-९(३३), दिनांक ०९.०२.२००९.
३) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्रमांक: झेडपीए- २००८/प्र.क्र.४४४/वित्त-९, दिनांक १५.०७.२००९.
४) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्रमांक: विकास २००९/प्र.क्र.५७/पंरा-८, दिनांक ०२.०६.२००९.
५) शासन परिपत्रक,ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्रमांक: तेविआ २०१०/प्र.क्र.७३/वित्त-४, दिनांक ०८.१२.२०१०.
६) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्रमांक: विकास २००९/प्र.क्र.१९३/पंरा-८, दिनांक ०३.०५.२०११
७) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्रमांक: विकास २०१३/प्र.क्र.१५६/योजना-६, दिनांक १८.०७.२०१३.

प्रस्तावना :

मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधांच्या कामांसाठी उपरोक्त शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्याची कार्यपध्दती व कामाचे निकष विहित करण्यात आलेले आहेत.

२. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात या योजनेअंतर्गत विशेष निधी उपलब्ध झालेला असून या विशेष निधीअंतर्गत मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे, निकष व निधी वितरीत करण्याची कार्यपध्दती याबाबत सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या विशेष निधीचे वितरण व कार्यप्रणाली संदर्भात शासन स्तरावर सांगोपांग विचार करुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

शासन निर्णय :-

मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधांच्या कामांसदर्भात कोणती कामे घेता येतील याचा उल्लेख संदर्भ क्र.६ येथे नमुद केलेल्या दिनांक ३ मे,२०११ व संदर्भ क्र.७ येथे नमुद केलेल्या दिनांक १८ जुलै,२०१३ च्या शासन निर्णयात विहित केलेला आहे. सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षात उपलब्ध होणाऱ्या विशेष निधीचे वाटप करताना कोणती कामे घेण्यात यावीत, निधी कसा वितरीत करण्यात येईल व कामाची अंमलबजावणी कशी होईल या संदर्भात **खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत असून या विशेष निधीपुरताच हा शासन निर्णय कार्यान्वित राहील** :-

(१) मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामाचे मागणीपत्र/प्रस्ताव शासन स्तरावर स्वीकारण्यात येतील.

(२) सदर योजनेअंतर्गत दिनांक ३ मे,२०११ व दिनांक १८ जुलै,२०१३ अन्वये नमुद केलेली कामे विचारात घेण्यात येतील :-

गावांतर्गत रस्ते,गटारे, पाऊसपाणी निचरा (Storm water drainage ), दहनभूमी व दफनभूमीची सुधारणा करणे, संरक्षक भिंत, ग्राम पंचायत कार्यालय बांधकाम करणे, आठवडी बाजारासाठी सुविधा, गावामध्ये कचरा डेपोसाठी व प्राथमिक प्रक्रियेसाठी सुविधा, सार्वजनिक जागेत वृक्ष लागवड व त्यांचे संरक्षण, सामाजिक सभागृह/समाजमंदिर, सार्वजनिक शौचालय, रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक्स बसविणे व अन्य मुलभूत सुविधा.

(३) शासन स्तरावर मा.लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेले मागणीपत्र /प्रस्ताव या सर्वांचा विचार करण्यात येवून कामांच्या निकडीनुसार तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांसाठी निधी मंजूर करण्याचा निर्णय शासन स्तरावरुन घेण्यात येईल.

(४) सदर कामांसाठी देण्यात येणारा निधी हा मंजूर कामांच्या यादीसह अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांच्याकडे उपलब्ध करुन देण्यात येईल. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार मंजूर कामाच्या बाबतीत आवश्यकतेप्रमाणे प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी, निविदा काढणे, स्विकारणे इत्यादी बाबतची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याकडून करुन घेण्याची जबाबदारी अधिक्षक अभियंत्यांची राहील.

(५) शासन स्तरावरुन मंजूर झालेल्या कामांमध्ये अपवादात्मक परिस्थितीत बदल करावयाचे झाल्यास त्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहतील. मात्र कामामधील बदल हे वरील (२) मध्ये नमुद कामांपुरतेच मर्यादीत रहातील.

(६) या कामांची गुणवत्ता तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित नियमानुसार करुन विहीत पध्दतीनुसार देयके अदा करण्यात यावीत.

(७) विशेष निधीमधून मंजुर करण्यात आलेली सर्व कामे मुदतीमध्येच पुर्ण होतील या दृष्टीने अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी नियंत्रण ठेवावे. सदरील कामे पुर्ण झाल्यानंतर त्या संबधीची अंदाजपत्रके, प्रशासकिय मान्यता व तांत्रिक मान्यतेचे आदेश, पुर्णत्वाचे दाखले, उपयोगिता प्रमाणपत्रे, काम करणाऱ्या कत्रांटदाराचे नाव, देयके अदा केल्याची कागदपत्रे, कामावर देखरेख करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव इत्यादी तपशील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबधीत अधिकाऱ्यांनी संबधीत पंचायत

समितीचे गटविकास अधिकारी यांचेकडे सुपुर्द करावेत. गट विकास अधिकाऱ्याने सर्व कागदपत्रे व्यवस्थित व परीपुर्ण मिळाल्याची खात्री करुन आवश्यक ती पोच द्यावी. या अभिलेख्यामधील उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रचलित पध्दतीप्रमाणे जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

(८) विशेष निधीतून कार्यान्वित करण्यात येत असलेल्या किंवा पुर्ण झालेल्या कामांबद्दल उपस्थित होणारे मुद्दे किंवा इतर तक्रारी बद्दल आवश्यक ती कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाने करावी.

२. सदरचा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ३१.१०.२०१३ रोजीच्या अनौपचारीक संदर्भान्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यया आदेशानुसार व नांवाने

( नं. म. शिंदे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
४. मा.मंत्री(सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
६. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७. मा.विधानसभा / विधान परिषद सदस्य (सर्व) , विधानमंडळ, मुंबई.
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई.
९. मा.अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर.
११. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर.
१२. विभागीय आयुक्त (सर्व)
१३. सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (बांधकाम/रस्ते) मंत्रालय मुंबई.
१४.सर्व मुख्य अभियंता सां.बा. प्रादेशिक विभाग
१५.अधिक्षक अभियंता (सर्व),सार्वजनिक बांधकाम मंडळ.
१६.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७.सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१८.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१९.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
२०.उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती.
२१.सर्व सह सचिव / उप सचिव/ विकाअ/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ग्रा.वि.वि.
२२.निवड नस्ती, का.क्र.यो-६,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.